सहयोगी संवाद

सहयोगी शिक्षण अभियान

अंक २: मार्च २०२१



# नि:स्पृह योगदान



**मीनल दशपुत्रे,**
एस.एम.एफ.
प्रोजेक्ट डायरेक्टर

सहयोगी शिक्षण अभियानातंर्गत समाज विद्या केंद्रे ऑक्टोबर २०२० पासून यशस्वीपणे चालू ठेवणाऱ्या सर्व सरपंच, शिक्षण सारथी, तालुका समन्वयक आणि पालकांना माझे शतशः प्रणाम! या सर्व गावांनी हे दाखवून दिले आहे की कोविडच्या तडाख्यात गावातल्या चिमुकल्यांना बौद्धिक, सामाजिक आणि भावनिक बळ देण्याचे आव्हान हे कुठल्याही निधीवर अवलंबून न राहता गावाकडूनच समर्थपणे पेलले जाऊ शकते.

जानेवारी महिन्यात अझीम प्रेमजी विद्यापीठातर्फे करण्यात आलेल्या सर्वेक्षणात असे दिसून आले आहे की कोरोना काळात बंद असलेल्या शाळांमधील दुसरी ते सहावीतील विद्यार्थ्यांमध्ये, भाषा आणि गणित विषयांच्या मूलभूत क्षमतांवर परिणाम झाला. या निराशाजनक परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर सहयोगी शिक्षण अभियानांतर्गत मात्र प्रत्येक गावातील तरुण बंधू-भगिनींनी उत्साहाने, मानधनाची अपेक्षा न ठेवता, पहिली ते पाचवीच्या मुलांना रोज दीड तास वेगवेगळ्या शैक्षणिक कृतींमध्ये मग्न ठेवले. हे अनन्यसाधारण म्हणावे लागेल. आणि त्यांचे हे योगदान त्या मुलांच्या भावी आयुष्यात खूप मोलाचे ठरेल याची मला खात्री आहे.

हीच सामाजिक बांधिलकी व संवेदनशीलता कोविडोत्तर काळातही तुम्ही सर्वजण दाखवाल आणि महाराष्ट्रातील व भारतातील सर्व गावांना एक आदर्श समोर ठेवाल अशी मी आशा करते, जय हिंद!

## यशोगाथा SUCCESS



**आदिवासी भागात शिक्षणासाठी रंजनाताईंचा दृढ निश्चय; महिन्यात सुरु केली ११ समाज विद्या केंद्रे –**
**अधिक माहितीसाठी पुढील लिंकवर क्लिक करा..!**
**Like | Comment | Share | Subscribe**

**SMF Website :** https://bit.ly/3omXcwf
Instagram : https://bit.ly/2YCJBXe
LinkedIn : http://bit.ly/3pIzuf4
Facebook : http://bit.ly/2MQrQ3G
Twitter : https://bit.ly/2YBzGkv
**SMF Blog :** http://bit.ly/39GLpoh
YouTube : http://bit.ly/3otyrP2

# सद्यस्थिती

जिल्हे
१७

तालुके
४०

समाज
विद्या केंद्रे
२२५

शिक्षण
सारथी
२७०

विद्यार्थी
३९१८

शिक्षण सारथींचा

# सन्मान

## ग्रामपंचायतचे ध्वजारोहण शिक्षण सारथींच्या हस्ते



**भरत रुपनर**
शिक्षण सारथी



**बाबासाहेब मुंडे**
शिक्षण सारथी

आम्ही शिक्षण सारथी, भरत रुपनर व बाबासाहेब मुंडे, आमच्या ममदापूर परळी ता. अंबाजोगाई जि. बीड येथे गेल्या दीड महिन्यापासून दोन समाज विद्या केंद्रे चालवित आहोत. आम्ही दोघेही शिक्षण सारथी म्हणून अतिशय तळमळीने कार्य करीत आहोत. गावातील विद्यार्थ्यांसाठी दिलेल्या या योगदानाबद्दल पालक आणि इतर ग्रामस्थ समाधानी आहेत असे, सरपंच व पालकांशी चर्चा करताना आढळून आले.

या कामाची दखल सरपंच व ग्रामस्थांनी घेतली. सरपंच स्वत: या काम जातीने लक्ष घातले आहे. २६ जानेवारी रोजी प्रजासत्ताक दिनानिमित्त ग्रामपंचायत कार्यालयाचे ध्वजारोहण आम्हा दोघांच्या हस्ते करण्याचा निर्णय त्यांनी घेतला. ही बाब आमच्यासाठी खूपच अभिमानाची होती.

या कार्यक्रमाप्रसंगी मनोगत व्यक्त करण्याची संधी आम्हाला त्यांनी दिली. यावेळी मला आनंदाश्रू आवरले नाहीत. सरपंच आणि ग्रामस्थांनी या कामाचे खूप कौतुक केले. यापुढे अशाच प्रकारे गावासाठी पुढाकार घेण्याचे आवाहन केले.

सरपंच व ग्रामस्थांनी घेतलेला हा पुढाकार आमच्यासाठी प्रेरणादायी आणि आमचा आनंद द्विगुणीत करणारा ठरला.



**गाव**–ममदापुर परळी, **तालुका**–अंबाजोगाई, **जिल्हा**–बीड

# कर्तृत्ववान तरुणांना मिळाले शांतिलाल मुथ्था फाउंडेशनचे बळ



**सर्वेश्वर जगदेव चौके**
जिल्हा समन्वयक बुलडाणा
सहयोगी शिक्षण अभियान

मी जेव्हा पहूजिरा गावामध्ये समाज विद्या केंद्राबद्दल माहिती देण्यासाठी गेलो तेव्हा ग्रामपंचायत निवडणुकीची तयारी सुरू होती. तिथे मी माझ्या ओळखीतील गुरुदेव सेवा मंडळाचे सदस्य श्री.अंकित खारे यांना भेटलो. त्यांना समाज विद्या केंद्राबद्दल माहिती सांगितली. त्यांनी श्री.ज्ञानेश्वर घोपे, श्री.आकाश खंडारे, श्री.सचिन पहूरकर, श्री. रुपेश पहूरकर या सर्व स्वयंसेवकांची भेट घालून दिली.

सर्वांची स्वयंसेवक म्हणून काम करण्याची तयारी होती. या सर्वांना उपक्रमाची पूर्ण माहिती व प्रशिक्षण देण्यात आले. मागील पंधरा दिवसांतच विद्यार्थ्यांची संख्या शंभरच्या वर गेलेली आहे.

आता या समाज केंद्रात १०५ विद्यार्थी आहेत. विद्यार्थी संख्या वाढल्यामुळे विद्यार्थ्यांना बसण्यास जागा कमी पडू लागली. त्यामुळे त्यांनी हे समाज विद्या केंद्र दोन वेळेस चालविण्याचे ठरविले. सकाळी दहा वाजता एक बॅच व दुपारी तीन वाजता दुसरी बॅच अशा दोन बॅचेस चालू झाल्या.

समाज विद्या केंद्र सुरू झाले, परंतु मास्क, सॅनिटायझरचा पुरेसा साठा नव्हता. भारतीय जैन संघटनेचे तालुका अध्यक्ष श्री.सुरेशजी जैन यांनी सर्व मुलांना मास्क व सॅनिटायझर पुरवून मोलाचे सहकार्य केले. केंद्रातील मुलांनी २६ जानेवारी निमित्त विविध सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन केले. विद्यार्थी संख्या जास्त आहे आणि सर्व शिक्षण सारथी खूप उत्साहाने त्यांच्यासाठी मेहनत घेत आहेत

धन्यवाद !!!

# मी अनुभवलेले समाज विद्या केंद्र



**अविनाश दत्ताजी गेडाम**
तालुका समन्वयक
समाज विद्या केंद्र गाव: सतपल्ली,
ता: झरी(जामणी), जि: यवतमाळ

नशीब हे आकाशातून पडत नाही किंवा जमिनीतून उगवत नाही. माणूस स्वतःचे नशिब स्वतःच घडवित असतो. आपण जे करू त्याप्रमाणे नशिब घडेल. हीच गोष्ट समाज विद्या केंद्रातून आजच्या कोविड -१९ परिस्थितीच्या काळात दिसून आली आहे. समाज विद्या केंद्राची सुरुवात ग्रामपंचायतीने ठरवून दिलेल्या निकषांनुसार करण्यात आली.

**समाज विद्या केंद्र सुरु होण्यापूर्वीची परिस्थिती :**

**कोविड-१९** मुळे सुट्ट्यांमध्ये सतत खेळणे, आई-वडिलांसोबत शेतात जाणे, नाले, नद्या, डोंगर, रानोमाळ दिवसभर भटकणे, हट्टीपणा करणे, छोट्याछोट्या गोष्टीवरून भांडण करणे, पालकांच्या मोबाईलवर गेम खेळणे अशा सर्व गोष्टी घरामध्ये मुलांकडून घडत होत्या. त्यामुळे सर्वच पालक त्रस्त झाले होते. विद्यार्थी शिक्षणापासून दूरावत चालले होते.

**समाज विद्या केंद्र चालू झाल्यावर मुलांमध्ये झालेले बदल**

सहयोगी शिक्षण अभियानाच्या पुस्तकातील उपक्रम घेण्यास सुरुवात केल्यावर विद्यार्थ्यांना एका ठिकाणी बसून काही शिकण्याची आवड निर्माण झाली. खेळ, गाणी, मूल्यवर्धन उपक्रम, भाषिक उपक्रम, गोष्ट, संभाषण, कला अशा विविध उपक्रमांमध्ये मुले रमू लागली. सोबतच सकाळी योगा, दिनविशेष, कधी कधी सहल असे उपक्रम राबविणे सुरु केले.

आता काही पालक स्वतः मुलांना केंद्रावर सोडतात. इयत्ता ६ वी ७ वीचे काही विद्यार्थीदेखील केंद्रात उपस्थित राहतात. लेखन, वाचन, गृहपाठ नियमित करताना दिसून येतात. कधीकधी गावाशेजारच्या शाळेतील शिक्षकही केंद्राला भेटी देऊन विद्यार्थ्यांसोबत चर्चा करतात. मुलांचा आनंद पाहून मन प्रसन्न होते.

# ग्रामसेवकाचे मनोगत



**श्री. संदीप बबन कदम**
ग्रामसेवक धामणवणे
ता. चिपळूण, जि. रत्नागिरी

कोरोनामुळे अजूनही लहान मुलांच्या शाळा बंदच आहेत. या काळात झालेल्या आर्थिक गोष्टीचा नुकसानीचा हिशोब प्रत्येकजण लावत होता. सात–आठ महिने शाळेत न जाणाऱ्या मुलाकडे मात्र कोणाचेच म्हणावे तसे लक्ष नव्हते.

लॉकडाऊन संपल्या पासून लोक सकाळी कामाला जात व संध्याकाळी उशीरा घरी येत. काही मुलांचे पालक शिक्षित नसल्याने मुलांचा अभ्यास घेऊ शकत नव्हते. अशावेळी या मुलांचे खूप नुकसान होत आहे, ही बाब मी एक अधिकारी म्हणून जाणत होतो, पण त्यावर मार्ग काही दिसत नव्हता.

एके दिवशी मूल्यवर्धन तालुका समन्वयक रक्षिता डाकवे मॅडम माझ्याकडे आल्या. त्यांनी समाज विद्या केंद्राविषयी माहिती सांगितली. ही कल्पना मला फार आवडली.

सरपंच, ग्रामस्थ, पालक आम्ही सर्वजण एकत्र आलो. कुठे केंद्र सुरु करता येईल, याविषयी चर्चा केली. वाडीतील प्रमुख ग्रामस्थांनी आपल्याला अंगणात मुलांना बसायला जागा दिली आणि दोन ऑक्टोबर पासून आमच्या गावात चार समाज विद्या केंद्रे चालू झाली.

अनेक दिवस शाळेत न गेलेली मुले आनंदाने समाज विद्या केंद्रात जाऊ लागली. आम्ही आमच्या ग्रामपंचायतीच्यावतीने समाज विद्या केंद्रातील सर्व विद्यार्थी व स्वयंसेवक यांना मास्क व सॅनिटायझरचा पुरवठा केला व अजूनही करत आहोत. कोणतेही मानधन न घेता समाज विद्या केंद्र चालवणाऱ्या चारही स्वयंसेवकांचे मला कौतुक वाटते. 'ज्ञान दिल्याने ज्ञान वाढते' हे तत्त्व मनाशी बाळगून निखळ सेवाभावी वृत्तीने त्या अविरत काम करत आहेत.

धन्यवाद !

# अधिक माहिती



**शांतिलाल मुथ्था फाउंडेशनचे 'सहयोगी शिक्षण अभियान' साडे तीनशे गावात राबविणार : आशिष देशमुख**

**www.youtube.com**

''कटोल-नरखेड तालुक्यात पहिली ते चौथीचे नऊ हजार विद्यार्थी आठ-नऊ महिन्यांपासून शिक्षणापासून दूर आहेत. या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक, सामाजिक, मानसिक, भावनिक नुकसान होत आहे. हे भरून काढण्यासाठी साडे-तीनशे गावात एक हजार शिक्षण सारथींची नेमणूक केली आहे. या गावांमध्ये सहयोगी शिक्षण अभियानाच्या माध्यमातून वर्ग भरवून विद्यार्थ्यांचे झालेले नुकसान भरुन काढणार आहेत.'' असा निर्धार काटोल-नरखेडचे माजी आमदार श्री. आशिषजी देशमुख यांनी केला आहे.

https://www.youtube.com/watch?v=IhgnFyW0VCI



**'समाज विद्या केंद्र' सुरु करण्यासाठी 'शिक्षण सारथी'ने दिली स्वत:ची जागा...अधिक माहितीसाठी पुढील लिंकवर क्लिक करा..!**

**Like | Comment | Share | Subscribe**

**SMF Website :** https://bit.ly/3omXcwf
Instagram : https://bit.ly/2My2nMB
LinkedIn : http://bit.ly/3psM4PJ
Facebook : http://bit.ly/3pr52pR
Twitter : https://bit.ly/3orC4oy
**SMF Blog** : http://bit.ly/39GLpoh
YouTube : http://bit.ly/3otyrP2



**'असे धुतो हात' गाण्यातून विद्यार्थ्यांचा स्वच्छता संदेश! कसा आणि कोणत्या गावातील मुले हा संदेश देत आहेत, हे पहायचंय ना?**

**Google** : https://bit.ly/2NefQcU
Instagram : https://bit.ly/2M6S4iI
LinkedIn : http://bit.ly/37oI5N6
Facebook : http://bit.ly/37pq1SX
Twitter : https://bit.ly/3qAQPao
Pinterest : https://pin.it/m5e5qmj
YouTube : https://bit.ly/3jZYQ67

**तुमचे मित्र, कुटुंब आणि तुमच्या ओळखीच्या लोकांशी सामायिक करण्यासाठी आणि कनेक्ट होण्यासाठी Facebook मध्ये लॉग इन करा. सहयोगी शिक्षण अभियानाच्या शिक्षण सारथी प्रशिक्षणाचे उद्घाटन**

**SMF Website :** https://bit.ly/3omXcwf
Instagram : https://bit.ly/3oMPfAp
LinkedIn : http://bit.ly/3q4EoDH
Facebook : http://bit.ly/2LlCeQK
Twitter : https://bit.ly/3oLHURK
Pinterest : http://bit.ly/3tulisB

**SMF च्या 'सहयोगी शिक्षण अभियानाचे' होतंय सर्वदूर कौतूक नेमकं का होतंय कौतुक? या माहितीसाठी पुढील लिंकवर क्लिक करा..!**

**SMF Website :** https://bit.ly/3omXcwf
Instagram : https://bit.ly/3rDEX7Q
LinkedIn : http://bit.ly/3p5xBIp
Facebook : http://bit.ly/3q2xrTm
Twitter : https://bit.ly/2MOR1Eb
Pinterest : http://bit.ly/3aIDqq2

**Please Like, Comment, Share and Subscribe**

# सहयोगी शिक्षण अभियानाचे प्रशिक्षण



**Figure 1** काटोल नरखेड ( नागपूर) येथील शिक्षण सारथी प्रशिक्षण घेताने सुनील चौधरी, प्रशिक्षक

सहयोगी शिक्षण अभियानांतर्गत दूरस्थ तसेच समोरासमोर या दोन्ही प्रकारच्या प्रशिक्षणाचा अनुभव आला. कोविडच्या संसर्गामुळे समोरासमोर प्रशिक्षण शक्य नव्हते; परंतु फेब्रुवारी महिन्यात कोविड १९ चे नियम पाळून आयोजकांच्या मागणीनुसार प्रत्यक्ष प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले. त्यामध्ये ३५० इच्छूकांना समाज विद्या केंद्रे चालविण्याचे प्रशिक्षण देण्यात आले.

सहयोगी शिक्षण अभियान हा कार्यक्रम मुलांचे सामाजिक, भावनिक आरोग्य जपण्यासाठी तसेच मुलांचे शिक्षणातील सातत्य टिकून राहावे यासाठी समाजाच्या सहभागाने राबविला जातो. गावागावातील किमान १२ पास असलेले स्वयंसेवक शिक्षण सारथी म्हणून सेवा बजावतात. त्यांना दूरस्थ प्रशिक्षण नवीन होते. तरीही सर्वांनी प्रशिक्षणामध्ये सक्रीय सहभाग घेतला व दूरस्थ शिक्षण यशस्वीपणे पूर्ण केले.

प्रत्यक्ष उपक्रम कसा राबविण्याचा आहे यावर शिक्षण सारथींशी चर्चा, प्रश्नोत्तरे यांचा वापर करून चार ते पाच तासांचे एक चर्चासत्र आयोजित केले जाते. ही चर्चा समोरासमोर करण्याचा आनंद खूपच वेगळा आणि आत्मिक समाधान देणारा असतो.

दूरस्थ पद्धतीमध्ये तांत्रिक अडचणी खूप येतात. त्यापैकी एक म्हणजे नेटवर्क. समोरच्यांना कितपत समजले आहे, काय अडचणी आहेत हे समजणे कठीण जाते.

हे जरी खरे असले तरी आपल्याला तंत्र युगात दूरस्थ पद्धतीने प्रशिक्षण अधिक प्रभावी कसे देता येईल, यासाठी अधिक प्रयत्न करणे गरजेचे आहे. आता आमचे सर्व सहकारी दूरस्थ प्रशिक्षणात पारंगत झाले आहेत. गरज आहे ती सारथींसाठी तांत्रिक सहकार्याची.

# विद्यार्थी कट्टा



## कोमल धनराज मुंढे

इयत्ता- ४ थी
गाव- ममदापूर परळी,
तालुका- अंबाजोगाई, जिल्हा- बीड
समाज विद्या कें- ०१

मी इयत्ता चौथीच्या वर्गात शिकते मला शिकायला खूप-खूप आवडते.पण या कोरोनामुळे ना शाळेत जाता येते ना खेळायला .मोठी माणसे सतत घरी बसा, घरी बसा असे सांगत होती. खूप कंटाळा यायचा आणि एकटं-एकटं वाटायचं. मग आमच्या गावातील मोठा दादा भरत यांनी आम्हां मुलांना एकत्र करून शिकवायला सुरुवात केली.आम्हांला खूप आनंद वाटला सगळे मित्र,मौत्रिणी दररोज भेटायला लागलो. आम्हांला दररोज खेळ,गोष्टी,गाणी ,धडे शिकविले जातात त्यामुळे शाळेत शिकल्यासारखेच वाटते. मला माझे समाज विद्या केंद्र खूप खूप आवडते.



## सुमित पंडित खोले

इयत्ता : ४ थी
गाव : राक्षसभुवन (तांबा),
तालुका- शिरूर (का), जिल्हा- बीड
समाज विद्या केंद्र : ०१

कोरोनामुळे माझी शाळा बंद होती. शाळेतून मला सुरुवातीला मोबाईलवर अभ्यास पाठविला जात होता.माझे वडील दिवसभर मोबाईल त्यांच्याबरोबर कामावर घेऊन जात असल्याने तसेच, अनेकदा मोबाईल फोनला रेंज नसल्यामुळे अभ्यास होत नव्हता. दिवसभर मग सगळा वेळ खेळण्यात, TV बघण्यात काहीही न करता उगाचच जात होता. परंतु गावामध्ये अश्विनी मॅडमनी आमचा अभ्यास घेण्यास सुरुवात केली. यामध्ये गावातील माझ्या इतर काही मित्रांबरोबर मला खेळता आले, गाणी,गोष्टी, खेळ, चित्र काढणे अशा अनेक कृती केल्यामुळे वेळ मला खूप आनंद मिळाला. माझी शाळाच सुरु झाल्यासारखे मला वाटतय. नियमित समाज विद्या केंद्रात येण्यास मला खूप आवडते. मित्रांसोबत गप्पा मारता येतात. मला आता माझे वडील शिकवणीसाठी जा म्हणत आहेत. परंतु आता मला हा क्लासच खूप आवडत आहे. मॅडम आम्हाला खूप छान शिकवित आहेत..



# वृत्तपत्रांनी घेतलेली दखल



लोकमत

# ७०० ग्रामीण विद्यार्थी शिक्षणाच्या प्रवाहात

लॉकडाऊन सुरू असताना शिक्षणातील गळती रोखली : शांतीलाल मुथा फाउंडेशनचे सहयोगी शिक्षण अभियान

२० मुलांचा एक गट

जिल्ह्यातील समाज विद्या केंद्र

सुराज्य

विद्यार्थ्यांना मिळणार प्राथमिक शिक्षणाचे धडे

यौगिक तत्वावर मुथा फाऊंडेशनने सुरू केला उपक्रम

गोदातीर समाचार

गौखेल ग्रामपंचायतीचा समाजासमोर नवा आदर्श

प्रजासत्ताक दिन

संक्षिप्त

धाकली येथील शिक्षण सारथीचा गुणगौरव सोहळा

मराठवाडा साथी

शांतिलाल मुथ्था फाऊंडेशनतर्फे विद्या केंद्र उभारणार

विवेक सिंधु

गुरुवार दि.११ फेब्रुवारी २०२१

भारतीय जैन संघटना तर्फे शिक्षण सारथी यांचा सन्मान

समर्थ राजयोग

काटोल-नरखेड़ तहसील में साकार होगा 'समाज विद्या केंद्र': डॉ. आशीष देशमुख

## भारतीय जैन संघटनातर्फे शिक्षण सारथी यांचा सन्मान

सहयोगी शिक्षण अभियान उपक्रमात विद्यार्थी शिक्षण प्रवाहात व विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे, मास्कचे वाटप



**Shantilal Muttha Foundation Fackbook Watch** सहयोगी शिक्षण अभियाना'च्या उत्कृष्ट कार्याची शासनाने दखल घ्यावी : आमदार श्री. हरीशजी पिंपळे अधिक माहितीसाठी पुढील लिंकवर क्लिक करा..!...bit.ly

**SMF Website :** https://bit.ly/3omXcwf

: https://bit.ly/3pBZskG

: http://bit.ly/3cq2WD6

: http://bit.ly/3j2cMw1

: https://bit.ly/3tik6bR

**SMF Blog :** https://pin.it/48mvhPX

YouTube : https://bit.ly/39wPHyn

# क्षणचित्रे



















# सहयोगी संवाद



## सहयोगी शिक्षण अभियान

शांतीलाल मुथ्था फाउंडेशनच्या सर्व सोशल मीडीया प्लॅटफॉर्म्सला, लाईक, फॉलो, शेअर आणि सबस्क्राईब करण्यासाठी खालील लिंकवर क्लिक करावे.

SHANTiLAL MUTTHA FOUNDATiON

Together, can we do more?

Please 'Like', 'Share', 'Subscribe' and 'Follow' us on these platforms.

#SMFSocial

www.mutthafoundation.org

- bit.ly/SMF-FBPage
- bit.ly/SMFTwitter
- bit.ly/SMF-Instagram
- bit.ly/SMF-LinkedIn

Thank you and stay connected for latest information.



सहयोगी संवाद या अंकास भेट द्या
अंक वाचण्यासाठी पुढील लिंक
वर क्लिक करा

bit.ly/सहयोगी संवाद-अंक २

https://mutthafoundation.org/